खोदलेल्या विहिरीचें काम तसेंच विहीर खोदण्याचें काम जोरांत सुरू होते. तीनचार पुरुष

# केळीची लागवड

### लागवडीखालील क्षेत्र

भारतांतील एकूण फळांच्या क्षेत्रापैकीं २० टक्के क्षेत्र केवळ केळीच्या लागवडीखालीं आहे. महाराष्ट्रांत सर्व फळांच्या क्षेत्राच्या एकपंचमांश भागांत केळीची लागवड करतात. जवळ जवळ ६४७०० एकर जमीन केळीच्या लागवडीखालीं आहे. त्यांतील ५० टक्के जमीन एकट्या जळगांव जिल्ह्यांत आहे. जळगांवच्या खालोखाल ठाणा, परभणी, औरंगाबाद, धुळे, पुणें, वर्धा व सोलापूर इत्यादि जिल्ह्यांचा नंबर लागतो.

फार पुरातन काळापासून त्याची लागवड करतात. उत्पन्नाच्या दृष्टीनें केळी हें जगांतील अग्रगण्य फळ आहे.

आशिया हें केळीचें माहेरघर. भारतांतून ह्या फळाचा प्रसार पाकिस्तान, इजिप्त इत्यादि ठिकाणीं झाला. पूर्व आफ्रिकेंत केळीचा प्रसार झाला तो आशियाकडून. इ. स. १५१६ सालापासून अमेरिकेंत केळीच्या लागवडीस सुरुवात झाली.

पुरवठा आहे अशा ठिकाणीं [illegible] लागवड करावी. नदीजवळ केलेली चांगली. विशेषत: ज्या ठिकाणीं रस्ते व रेल्वेच्या सोयी दळणवळणासाठीं आहेत, मध्यम प्रतीचा बाजार आहे तेथें केळीची लागवड करणें फायद्याचें ठरतें

### हवामान

.केळीसाठीं लागणाऱ्या हवामानाचा विचार करतां आपणास दोन गोष्टींचा प्रथम विचार करणें अत्यावश्यक आहे. १) तपमान, २) जमिनींतील ओलावा.

### तपमान

६० ते १००° फॅ. उष्णतामान-केळीच्या वाढीसाठीं उपयुक्त असतें. ६०° फॅ. पेक्षां तपमान कमी असल्यास केळीच्या वाढीवर त्याचा परिणाम होतो. ४५° फॅ. पेक्षां कमी तपमान असेल तर झाडाचीं पानें पिवळीं पडतात. कधीं कधीं तर हीं पानें मरतातदेखील. जास्त उष्णतामान देखील केळीच्या वाढीसाठीं हितावह नाहीं. केळीचे झाड वाढत असतांना हवेंत आर्द्रता कमी आहे परंतु उत्पन्न तर जास्त हवें आहे, अशा वेळेस बागेस पाण्याची अतिशय गरज असते. उष्ण तपमान व १९ ते २० इंच पाऊस असलेल्या भागांतही केळीचे उत्पन्न येऊं शकते. ज्या भागांत १५ इंच पाऊस पडतो तेथें केळी येऊं शकतात. परंतु त्यासाठीं जमीन चांगल्या निचऱ्याची असावी लागते.

### जमिनीची निवड

बाग लावण्याच्या अगोदर पुढील गोष्टी विचारांत घ्यावयास हव्यात. १) हवेंतील आर्द्रता २) जमीन ३) पाणीपुरवठा ४) दळणवळण व ५) बाजार. बागेसाठीं निवडलेली जागा वादळापासून सुरक्षित असावी. वर्षांतील आठ महिने आपणास पाणी द्यावयाचें आहे असा विचार करून जमीन सपाट निवडावी त्यामुळें पाणी समपातळींत दिले जातें.

भारी, काळी व चिकट जमीन केळीसाठीं योग्य नसते. जमीन सुपीक असल्यास फारच उत्तम. परंतु अशी जमीन चांगला निचरा होणारी असावी. आमळ ते साधारण अल्कली ह्या प्रतीच्या जमिनींत केळी येतात.

### लागवड

केळीची लागवड (सोपक) सकर जमिनींत लावून करतात. सकर म्हणजे नवीन वाढणारे कंद, मुळ्या, खोड व पानासहीत असलेले लहानसें झाड.

सकरस् मुख्य झाडावर वाढतात. त्यांच्या वाढीसाठीं लागणारे अन्न ते ते मुख्य झाडापासून शोषून घेतात. म्हणूनच त्यांचीं पानें अरुंद असतात. जेव्हां आपण सकर मुख्य खोडापासून बाजूला काढतो तेव्हां त्यांना स्वत:चें अन्न स्वत:च तयार करावें लागतें. त्यामुळें त्यांची पानें रुंद होतात. (कारण झाडांना लागणारें अन्न हे पानामधील हिरव्या क्लोरोफिलच्या

ण्याची पद्धत प्रचलीत आहे. संशोधनाअंती असें आढळून आलें आहे की, कंद जर लहान असेल तर केळी येण्यास वेळ जरी थोडा जास्त लागला तरी उत्पन्न खूप येते.

लेखक : सुभाष के. पगारे
बी. एस्सी. (अॅग्री.)

कंद फारच लहान असला तर भारी जमिनींत त्याची फुट होत नाहीं कारण अशा ओलसर जमिनींत कंद कुजण्याची शक्यता फार असते. (जास्त वय असलेला) जुना कंद लावल्यास फळ साधारणत: लौकर सुरू होतें परंतु केळीचे घड लहान असतात. म्हणून भरपूर उत्पन्न येण्यास लागवडीसाठीं अर्धा ते एक किलो वजन असलेला कंदाचा तुकडा वापरावा.

कांही वेळेस नैसर्गिकरीत्या उत्पन्नांत बदल घडून येतो तो केवळ वंशा-

## केळीचे आगर भारतांतच आहे तेथून ते इतर देशांत गेले

खूप उताराची पडित असलेली जमीनसुद्धां आपण केळीच्या बागेसाठीं उपयोगांत आणूं शकतो परंतु त्यासाठीं कारंजे (स्प्रिंकलर) पद्धतीनें पाणी द्यावयाची सोय असावी.

नदीच्या, नाल्याच्या किनाऱ्याजवळ, ज्या भागांत पुराचे पाणी येऊं शकणार नाहीं तेथें केळीची लागवड करणें हितावह ठरते.

केळीच्या मुळांना वाढीसाठीं, पाणी व क्षार शोषून घेण्यासाठीं प्राणवायू मोठ्या प्रमाणावर लागतो. तेव्हां ज्या जमिनींतून मुळांना भरपूर हवा मिळेल अशी जमीन जास्त योग्य असते. केळीचे मूळ २ ते ३ फूट खोलवर जमिनींत जाते. जमीन खोल असेल तर मूळें ४ ते ५ फुटापर्यंतदेखील जातात. तेव्हां चांगल्या निचऱ्याची

साहाय्यानें, सूर्यप्रकाशांत हवेंतील कार्बनडाय ऑक्साईड वायू घेऊन तयार केलें जातें.) तेव्हां केळीची लागवड करतांना सकरस् अरुंद पानांचे आहेत, याची खात्री करून घ्यावयास हवी. रुंद पानांचे सकरस् होऊं नयेत कारण असे सकरस् मुख्य खोडापासून फंगस, किडे इत्यादींनीं केलेल्या जखमांमुळें बाजूला झालेली असण्याची शक्यता असते व त्यामुळें त्यांचीं पानें स्वत:चें अन्न तयार करण्यासाठीं रुंद झालेली असण्याची शक्यता असते.

### सकर कसे असावे ?

साधारणत: सकर २ ते ४ महिन्यांचें असावें. ते ओलसर जमिनींत लावावें. कोरड्या भागांत सकर लावल्यास त्यांचे खोड वाळण्याची शक्यता असते व त्यामुळें मधूनमधून जागा रिकामी रहाते. हे टाळावयाचे असल्यास मुळें. त्यासाठीं त्याकडेसुद्धां दुर्लक्ष करून चालणार नाहीं. ज्या झाडास भरपूर केळी येतात अशा झाडावर खूण करून ठेवावी व नंतर त्यावरील सकरचा किंवा त्याच्या कंदाचा उपयोग लागवडीसाठीं करावा.

१) अंतर– नेहमीप्रमाणें नांगरणी वखरणी करून जमीन तयार करावी. २० ते ४० गाड्या खत टाकावें. सुरुवातीस खत खूप टाकले तर उत्पन्नांत निश्चितच वाढ होत रहाते. ज्या भागांत शेणखत स्वस्तात मिळते तेथें ते भरपूर प्रमाणांत टाकावयास हवें. सहसा चौरसाकृतीनें केळीची लागवड करतात कांहीं भागांत आयताकृती पद्धतदेखील वापरतात. (अपूर्ण)

**मुखपृष्ठावरील छायाचित्र : श्री. मधुकर य. ढेंद्रे, कोल्हापूर**

## जिवा

पान ५ वरून चालूं

माल विकत घेणारे बदमाष व्यापारी आहेत. रेल्वे यार्डात उघडपणें चोऱ्या करणारे लुटारू आहेत. या लुटारूंमध्यें पुष्कळदां रेल्वे रक्षकदेखील असतात—अन् या लुटारूंमधें संभवित—अधिकारीही असतात. त्यांचे लुटमारीचे मार्ग वेगळे आहेत.

या रेल्वेवरील चोऱ्यांचा आळ पुष्कळदा तृतीय नि चतुर्थ श्रेणींच्या नोकरांवर येतो. मध्यरेल्वेच्या माटुंगा डेपोमधें पंधरा हजारांची चोरी झाली. संशय या नोकरवर्गाचा घेण्यांत आला.

म्हणून या नोकराच्या संघटनेनं रेल्वेमंत्र्यांना पत्र पाठविलं आहे. असल्या प्रकरणांची चौकशी करावी अशी मागणी त्यांनीं केली आहे.

जिवा म्हणतो-ब्रिटिशांच्या राजवटींत अशी एक चौकशी समिती नेमण्यांत आली होती. तशी चौकशी समिती आतां नेमली पाहिजे. कारण रेल्वेमधेंच शेत खाणारी कुंपणं फार झालीं आहेत. ★★

## चतुर किती बायका

पान ७ वरून चालूं

व इतर कांहीं शास्त्रांचा आधार असला तरी हें वागणें नि:संशय तिरस्कारणीय, धिक्कारणीय आहे. आपल्या दुष्ट वागणुकीनें, भेदक बोलण्यानें सुनेचं मन दु:खानं पिचून निघतंय, यातनाचे कढ तिला आवरेनासे होतात आणि त्यामुळें ती आत्मघात करण्यास प्रवृत्त व्हावी ही अतिशय घृणास्पद तशीच कुळाला लांछनास्पद बाब आहे

सासूनें सुनेचा छळ केल्यावर ही नवी सून मनांत आणि चारचौघांत आपण आपल्या सुनेला छळणार नाहीं, तिला मुलीप्रमाणें वागवणार अशी कबुली देऊन टाकते. परंतु प्रत्यक्षांत सासूपण आल्यावर या वचनाची आठवण व त्याप्रमाणें कृति करण्याचें सर्वांनाच भान असतें असें नाहीं. पुन्हां सासू–सुनाचा वाद रंगतच जातो.

### सून माणूसच आहे !

सुनांवर होणारा हा अन्याय सासवांना समजतच नसेल का ? निश्चित समजतो. पण पक्षपात बुद्धीनं त्याचंच समर्थन केलं जातं. सून माणूस आहे. नवखी आहे. सासूच्या दडपणाखालीं ती थोड्याफार फरकानं नी नेहमींच बुजलेली रहाणार; तिच्या हातून चुका होणार. जशा सगळ्यांच्या होतात तशाच ! पण सुनेची चूक सासूला मानवत नाहीं. सून माणूस आहे म्हणूनही तिच्या चुकांवर व दोषांवर पांघरूण घालण्यास सासू तयार होत नाहीं. चारचौघांत तिची फजीती करण्याचा नामी मोकाही ती सोडत नाहीं. शेजारीपाजारी व नातेवाईकांत सुनेबद्दल एकेक गोष्टी मोठ्या चवीनें सांगितल्या जातात. सुनेच्या हालचालीकडे रिंगमास्तराच्या कडव्या तीक्ष्ण नजरेनें बघून दिसेल तेथें, संधी मिळेल तेव्हां विखारी शब्दाचे फटकारे सुनेला मारले जातात अन् येथेंच सुनेला सासर व माहेर यांतला फरक समजूं लागतो.

### स्वप्नाचा विध्वंस

खरे म्हणजे सुखासाठी, स्वत:चं चिमुकलं विश्व निर्माण करण्याच्या नैसर्गिक सहजसुलभ भावनेच्या परिपूर्तीसाठीं मुलगी विवाह करून सर्वस्वी अनोळखी असलेल्या माणसाच्या अपरिचित घरांत

तिला होतो. सून मग सासुची 'मुलगी' रहात नाहीं. तिऱ्हाईतपणाचे नवीन नको तें नाते दोघींमध्यें येते. दोघी एकमेकींना परक्या होतात, दुष्ट अंतर वाढतच जाते.

" बाळ, तूं दमलीस हो पड आतां जरा " असं म्हणणारी ती आई अन् " एवढेसे काम करून दमायला होतं बरं ? दिवसाढवळ्या आजारीपणाचं सोंग घेऊन लोळायला होतंय काय ? घरांतलीच काम आहे ना ? कां विकतची कामें आणलीत घरांत " असं म्हणणारी ती सासू. अशी स्पष्ट रेषा सून सासू व आई यांच्या नात्यामध्य ओढली जाते.

### सुनेच्या चुकांचे प्रदर्शन

विवाह झाल्यावर नवीन सुंदर संसार सजविण्याच्या थाटांत ताज्या

घरांत सून आल्यावर एवढी वर्षें गाडा ओढत आलेली सासू बैठकीच्या खोलींत बसून नाटकावर नाटके, कादंबऱ्यावर कादंबऱ्या, वर्तमानपत्राचे ढीग वाचूं लागली. आतांपर्यंत कामाच्या रहाटगाडग्यांत तिला वाचनाची हौस पुरवतां आली नसेल, हें समजूं शकते. पण त्याच वेळी घरांत नवीन आलेल्या सुनेनें चोवीस तास काम करून तिला नवऱ्याचे स्वागत करण्यासाठीं त्राण राहूं नयेत ह्याला काय म्हणावे ? सून आली म्हणजे एक हक्काची मोलकरीणच आली असं मानायला लागल्यावर दोघींत प्रेम कुठले रहायला ? झगडेच होणार !

सून गुणवती मिळाली. पण तिच्याकडून मिळाला हवा तसा हुंडा मिळाला नाहीं. म्हणून तिचा छळ

हें वर्तन सुनेच्या भूमिकेला धरून नाहीं सुनेचीहि सासूच्या प्रति कांहीं कर्तव्यें आहेत. सून आपल्या मुलाची बायको आहे. ही बायको सुखी तर आपला मुलगा सुखी हा विचार सासूनें मनांत रुजवायला हवा. सासूचा सासुरवास सहन करूनहि सुनेची तिच्या घराबाबत, तिच्या जीवनसाथीबाबत, तिच्या मुलांबाबत, सासरच्या प्रत्येक माणसाबाबत व तिच्या सासूबाबत कांहीं कर्तव्यें आहेत. त्याचा संपूर्ण विचार केल्याशिवाय व त्याच्या कृतीनेंच हा सासू–सुनेच्या वादावादींतला तिखटपणा जाण्यास मदत होईल. त्याचा विचार कधींतरी करायला हवा. ★★

## सूनेनेंहि सासूच्या प्रति आपली कर्तव्यें ओळखावीत

प्रवेश करते ती सुंदर स्वप्नांची पोतडी घेऊनच ! सासूचा बोचरा सासुरवास तिनें हिशोबांत धरलेला नसतो. नवऱ्याची आई ती आपली आई, हेंच तिचें गणित असतें. नवऱ्याच्या आईला सुख दिलें तर पर्यायानं नवराहि संतुष्ट राहील ही साधी गोष्ट तिला समजलेली असते.

### सासू ती सासूच !

परंतु सुनेच्या न्याय्य हक्कावरच सासू डोळा ठेवून वागूं लागली कीं ही आपली 'सासू' आहे, ती कांहीं आई नाहीं, या फरकांतला आघात उत्साहानं कामाचे गाडे उपसण्यांत सून धन्यता मानते पण त्यांत एखादी गोष्ट अनवधनानं राहून गेली वा व्हावी तशी झाली नाहीं तर सासू तीच गोष्ट उचलून धरते. अन् सूनेच्या वेंधळेपणाला प्रसिद्धी मिळते. सून खजील होऊन जाते. संसारांत रंग उधळण्यासाठीं उंचावलेले हात खाली येतात. रंगाचा बेरंग होतो. विरसता दाटते. घराबद्दलचा आपलेपणा वाटत नाहीं. यांतूनच तिला आत्मघाताचे विचार नाइलाजानें जवळ करावें लागतात.

माझ्या परिचयांतील एक कुटुंब आहे. सासुनें केला तर सून वैतागून जाणार ही गोष्ट मनुष्यस्वभावाला धरून आहे.

सुनेला मुलीच झाल्या, किंवा तिला मूलच झालें नाही ह्या अशा नानातऱ्हेच्या कारणानें सासू सुनेला बोलू लागली तर सुनेला जगणं असह्य होते आणि सासूच्या ठिकाणी आईचे रुप पहावयाचे अशी मनाला दिलेली शिकवण ती त्यावेळी विसरते.

सासूचा छळवाद सुनेला मानवत नाहीं. तीपण रीतीनं वागायचं सोडून देते. आत्मघात करते हें मनुष्य स्वभावाला धरून असेल. पण

## तिरके बाण

पान १० वरून चालूं

करूं. आणि ते पुढें म्हणाले होते, " कारण, अनोळखी सैतानापेक्षां ओळखीचा सैतान परवडला." जन्मोजन्मी तोच पती मागण्यांत स्त्रीचा कदाचित् असाच कांहींसा दृष्टिकोन असूं शकेल.

पण तें कांहींहि असो, आजच्या समाजाकडे नीट काळजीपूर्वक पाहिलें तरी असें दिसून येईल कीं स्त्रीवर कांहींहि बंधनें असली तरी पुरुषापेक्षां तिचेच जीवन अधिक सुखाचे आणि आरामाचे असते. पुरुषापेक्षां स्त्रीच्याच जीवनांत अधिक सुख असते. आम्हाला वाटते, असाच नीट विचार करून संध्या मंडलनें स्त्रीच राहण्याची निर्णय पक्का केला असावा ! ★★